दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे

● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार दि.७ नोव्हेंबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक -७७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

दादा आणि पवार साहेबांनी एकत्र यावे

पुणे (वृत्तसंस्था)-अभिनेता आणि कॉमेडीयन भाऊ कदम अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रचार करताना दिसणार आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मुख्यमंत्री व्हावे, अशी इच्छा बोलून दाखवली आहे. तसेच अजित पवार आणि शरद पवारांनी एकत्र यावे, असे देखील त्यांना वाटत असल्याचे त्यांनी सांगितले आहे.एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना भाऊ कदम म्हणाले, अजित पवारांनी लाडकी बहीण योजना आणली. प्रचंड मेहनत करणारा नेता आहे, म्हणून मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा स्टार प्रचारक म्हणून काम करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच मी पक्षात प्रवेश केला नसून केवळ स्टार प्रचारक म्हणून काम करणार असल्याचे देखील त्यांनी यावेळी स्पष्ट केले आहे. मी राजकारण करत बसलो तर सगळी कामे बाजूला राहतील, असेही भाऊ कदम म्हणाले.भाऊ कदम म्हणाले, मी अजित पवारांना भेटलो तेव्हा त्यांनी मला विचारले, हवा येऊ द्या का बंद झाले, त्यांना तो कार्यक्रम खूप आवडायचा. स्ट्रेसमध्ये असलो की मी कार्यक्रम पाहायचो, असे त्यांनी मला सांगितले. पुढे बोलताना भाऊ कदम म्हणाले, पवार कुटुंबात काय झाले मला माहिती नाही, मात्र मला वाटते शरद पवार आणि अजित पवारांनी एकत्र यायला हवे आणि अजित पवारांनी मुख्यमंत्री व्हावे, अशी इच्छा देखील त्यांनी बोलून दाखवली आहे. एकच वादा अजित दादा, गद्दारीबद्दल मी बोलणार नाही, त्यातील नेमकी माहिती माझ्याकडे नाही, असेही स्पष्टीकरण भाऊ कदम यांनी दिले.

मी महाराष्ट्राच्या हक्काचा एक कणही देत नव्हतो

एवढा दरारा दिल्लीत निर्माण केला होता ठाकरे;जनतेला दिली ५ मोठी आश्वासने

कोल्हापूर (वृत्तसंस्था)-शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी पुन्हा एकदा केंद्रातील सत्ताधारी भाजपसह राज्यातील महायुती सरकारवर हल्ला चढवला आहे. मी मुख्यमंत्रीपदी असताना महाराष्ट्राच्या हक्काचा एक कणही कुणाला देत नव्हतो. एवढा दरारा मी दिल्लीत निर्माण केला होता. यामुळेच त्यांनी आपले सरकार पाडले, असे ते म्हणालेत. ठाकरे यांनी यावेळी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर मुलांना मुलींसारखेच मोफत शिक्षण देण्याची ग्वाहीही दिली.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा आता उडाला आहे. उद्धव ठाकरे यांची मंगळवारी कोल्हापूरच्या राधानगरी - भुदरगड मतदारसंघात सभा झाली. या सभेतून त्यांनी भाजप व महायुती सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले, तत्कालीन महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये मी मुख्यमंत्री होतो. त्यावेळी मी महाराष्ट्राच्या हक्काचा एक कणही कुणाला देत नव्हतो. एवढा दरारा मी त्यावेळी दिल्लीत निर्माण केला होता. यामुळेच त्यांनी आपले सरकार पाडले. पण आता त्यांना महाराष्ट्र विकायचा आहे. सर्वकाही गुजरातला न्यायचे आहे. गद्दारी करून सर्वकाही विकले जात आहे.

उद्धव ठाकरे यांनी यावेळी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर मुलांना मोफत उच्च शिक्षणासह जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवण्यासंबंधीची ५ महत्त्वपूर्ण आश्वासने दिली. महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेच्या तुलनेत ही आश्वासने महाविकास आघाडीसाठी गेमचेंजर ठरणार असल्याचा दावा केला जात आहे.उद्धव ठाकरे म्हणाले, सरकारकडून राज्यातील विद्यार्थिनींना मोफत शिक्षण दिले जाते. पण राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर मुलांनाही मोफत शिक्षण दिले जाईल. मुलगा व मुलगी हे दोघेही कुटुंबाचे आधारस्तंभ असतात. त्यामुळे मुलांनाही मोफत शिक्षण मिळणे काळाची गरज आहे.

पोलिस ठाण्यात गेल्यानंतर महिलांना अनेकदा तक्रार कुठे करायची हेच कळत नाही. त्यामुळे मविआचे सरकार आल्यास राज्यात तातडीने महिला पोलिसांची भरती केली जाईल. राज्यात विविध ठिकाणी पोलिस ते वरिष्ठ पदांवर महिला अधिकारी कार्यरत असणारे विशेष पोलिस ठाणे सुरू केले जाईल.उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील अदानी यांचा धारावी पुनर्विकास प्रकल्प रद्द करून त्या ठिकाणी धारावीकरांना उद्योगधंद्यांसह घरे देण्याचेही आश्वासन दिले. तसेच राज्यातील गावखेड्यातील लोकांना मुंबईत येण्याचेही आवाहन केले. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यास अदानींचा धारावी पुनर्विकास प्रकल्प रद्द केला जाईल. त्या ठिकाणी धारावीकरांना उद्योगधंद्यांसह घरे दिले जातील. मुंबई सर्वांची आहे. मराठी माणसांची आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेने मुंबईत यावे. मुंबई मराठी माणसांनी रक्त सांडून मिळवली आहे. त्यामुळे मुंबईवर त्यांचा पहिला हक्क आहे. धारावी व मुंबई परिसरात भूमिपूत्रांना माफक दरात घरे उपलब्ध करून दिले जातील, असे ते म्हणाले. आमचे सरकार आल्यास राज्यातील शेतकऱ्यांना हमीभाव दिला जाईल. विशेषतः महाविकास आघाडीचे सरकार पडले नसते तर यंदाच्या वर्षी शेतकरी कर्जमुक्त झाला असता. पण आता आम्ही सत्तेत नाही. उद्या सत्तेत आल्यानंतर पुन्हा शेतीमालाला हमीभाव दिला जाईल.

मविआ सरकारच्या काळात ५ वर्षे जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर होते. आता पुन्हा आमची सत्ता आल्यास महाराष्ट्रात पुढील वर्षे जीवनावश्यक वस्तुंच्या दरात कोणताही बदल केला जाणार नाही. डाळ, तांदूळ, साखर, तेल आदी वस्तुंचे भाव स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.उद्धव ठाकरे म्हणाले, मी अडीच वर्षे मुख्यमंत्री असताना कोणती चूक केली हे मला सांगा. मी सर्वकाम करून दाखवली. त्यानंतरही आमचे सरकार पाडण्यात आले. मी अडीच वर्षे जे भोगले ते आज मांडण्यासाठी येथे आलो आहे. राज्यातील विद्यमान सरकार संधी मिळेल तिथे खात आहे. प्रकल्पाच्या नावाखाली कंत्राटदारांचे खिसे भरत आहे. निवडणुकीच्या तोंडावर या सरकारला लाडकी बहीण दिलील. पण १५०० रुपये देऊन कुणाचे घर चालते हे सांगावे, असा सवालही उद्धव ठाकरे यांनी यावेळी बोलताना केला.पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांनी पुढील १५ दिवस देशभरातील आपल्या नेत्यांना आणून महाराष्ट्रात रहावे आणि पराभव झाल्यानंतर पुन्हा निघून जावे, असेही उद्धव ठाकरे यावेळी बोलताना म्हणाले.

माजी आ.संगिता ठोंबरे यांचा असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केज विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार संगिता ठोंबरे यांनी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मोठा निर्णय घेतला आहे. संगिता ठोंबरे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.

केज विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूकीचे वातावरण चांगलेच तापले असून दररोज मतदारसंघात मोठ्या राजकीय घडामोडी घडत आहेत.

बीड जिल्ह्याचे खा. बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत संगिता ठोंबरे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी आ. संगिता ठोंबरे यांना पक्षाच्या वतीने मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र उपाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या स्वाक्षरीचे पत्र संगिता ठोंबरे यांना खा. बजरंग सोनवणे यांच्या हस्ते देण्यात आले आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे डॉक्टर सेलचे प्रदेशाध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे, दिलीप काळे, दिपक शिंदे यांच्यासह संगिता ठोंबरे यांचे असंख्य समर्थक उपस्थित होते.

माजी आ.संगिता ठोंबरे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केल्याने निश्चितच पृथ्वीराज साठे यांची ताकद वाढली आहे.

अंबाजोगाईत आज सामुहिक श्रीसूक्त हवनचे आयोजन

माहेश्वरी महिला मंडळ व यज्ञ सेवा समितीचा संयुक्त पुढाकार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात परमपूज्य बहुसोमयाजी यज्ञमार्तंड यज्ञेश्वर सेलूकर महाराज यांचे प्रमुख उपस्थितीत आज गुरूवार रोजी सामुहिक श्रीसूक्त हवनचे आयोजन करण्यात आले आहे.

माहेश्वरी महिला मंडळ व यज्ञ सेवा समितीचा संयुक्त पुढाकाराने आज दिनांक ७ नोव्हेंबर गुरुवार रोजी सायंकाळी ४.३० वाजता योगेश्वरी देवी मंदिर परीसर, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आलेल्या सामुहिक श्रीसूक्त हवन कार्यक्रमासाठी शहर व परिसरातील नागरिकांनी सर्वांनी लाभ घ्यावा अशी विनंती व आवाहन आयोजक माहेश्वरी महिला मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे. श्रीसूक्त हवनसाठी आवश्यक असणारे साहित्य कार्यक्रम स्थळी उपलब्ध आहे. अशी माहिती ही माहेश्वरी महिला मंडळ व यज्ञ सेवा समितीच्या वतीने देण्यात आली आहे.



संमिंद्रा फाउंडेशच्या वतीने भटक्याच्या वस्तीवर दिवाळी फराळ वाटप

तालुक्यातील स्वामी समर्थनगर,रामनगर वस्ती, शिंदेवस्तीवर २००किटद्वारे मेजवानी

शिरूर कासार ।प्रतिनिधी

गावोगावं भटकंती करून आपले पोट भरणारा मसनजोगी समाज, आईवाले, बहुरूपी, वासुदेव, कैकाडी,भिल्ल,आदिवासी अश्या समाजाला कुठलाही सण सहजा सहजी साजरा करण्याला वेळ अथवा अर्थजन नसल्याने रोजच्या रोजी रोटीसाठी भटकंती करून आपली उपयोजिका भागावी लागते. याचाच विचार करून पुणे येथील सन्मिद्रा फाउंडेशनच्या वतीने या लोकांना काल दिवाळी फराळाचे शिंदेवस्ती, रामनगरवस्ती, स्वामीसमर्थ नगर येथे संस्थेचे अध्यक्ष सदाशीव थोरात यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

पुणे येथील संमिंद्रा फाउंडेशन गेल्या कित्येक वर्षांपासून भटक्या लोकांसाठी कार्य करत असून आतापर्यंत या संस्थेच्या माध्यमातून अनेक गोरं गरीब कुटुंबातील मुलामुलींचे लग्न सर्व मानपानासहित लावून देण्यात आली आहेत. संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना देखील शालेय साहित्य एक वर्ष पुरेल एवढे शैक्षणिक साहित्य देऊन एक प्रकारे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले जात आहे. गेल्या वर्षी तालुक्यातील १०० भटक्या समाजातील मुलांना शाळेची गोडी लागावी व त्यांच्या पालकांना कुठलाही आर्थिक भार लागू नये म्हणून वस्ती वस्तीवर जाऊन तेथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप जुन मध्ये करण्यात आले होते.त्याचाच एक भाग म्हणून दिवाळी सणाचे औचित्य साधून काल पुणे येथून या भटक्या समाजातील लोकांसाठी २०० फराळकीट तयार करून आणून येथील भटक्या समाजाच्या वस्तीवर वाटप करण्यात आल्या.यावेळी सर्पराज्ञी प्रकल्पच्या

संचालिका सृष्टी सोनवणे,अंगद पानसंबळ यांच्या सह गोरं गरीब मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाहू महाराज छत्रपती खासदारकीचा राजीनामा देणार?

कोल्हापुरात काय घडलं,सतेज पाटील म्हणाले-फसवणूक झाली

कोल्हापूर । प्रतिनिधी

सध्या कोल्हापूर उत्तर मतदारसंघाची चर्चा राज्यभरात सुरू आहे. काँग्रेसनं आधी राजेश लाटकर यांना उमेदवारी जाहीर केली. त्यानंतर अंतर्गत विरोधामुळे त्यांना डावलून मधुरिमाराजे छत्रपती यांना उमेदवारी दिली.

अशातच काल मधुरिमाराजे यांनी ऐनवेळी माघार घेतली. अशा अनेक नाट्यमय घडामोड या मतदारसंघात घडल्या. मात्र, मधुरिमाराजे यांची माघार काँग्रेसचे नेते सतेज पाटील यांच्या चांगलीच जिव्हारी लागल्याचं पाहायल मिळतेय. त्यामुळे या निर्णयावर त्यांनी संताप व्यक्त केलाय. हे सगळं कसं घडलं, त्यावर काय प्रतिक्रिया आल्या, हे सविस्तर जाणून घेऊ.

सतेज पाटील म्हणाले फसवणूक झाली

शाहू महाराजांनी आणि मधुरिमाराजे यांनी आपली फसवणूक केल्याचं सतेज पाटील यांनी म्हटलंय. दरम्यान, मधुरिमाराजे यांनी माघार घेतल्यानंतर सतेज पाटलांचा संताप मीडियाच्या कॅमेऱ्यात कैद झाला. संतप्त पाटील यांनी अर्ज माघारीनंतर मधुरिमाराजे आणि शाहू छत्रपतींना उद्देशून केलेली वक्तव्य सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

भाजपच्या हाती आयते कोलीत

यावरून आता भाजपाचे नेते धनंजय महाडिक यांनी शाहू महाराजांचा आणि कोल्हापुरातील राजघराण्याचा अवमान सतेज पाटलांनी केल्याचं म्हटलंत. माध्यमांशी बोलताना धनंजय महाडिक म्हणाले, शाहू महाराज खासदारकीचा राजीनामा देणार असल्याची माहिती मला सोशल मीडियाद्वारे समजली. त्यांनी राजीनाम्याचा निर्णय घेतला असेल तर त्यात आश्चर्य वाटण्याचं काही कारण नाही.

कारण ज्या पद्धतीने शाहू महाराजांचा अवमान झाला तो कोणीही सहन करू शकणार नाही. आजपर्यंत कोणीही कोल्हापूरच्या राजघरण्याविषयी अशी वक्तव्यं करण्याचं धाडस केलं नव्हतं. पण सतेज पाटील स्वत:ला सर्वोच्च समजतात. त्यामुळे त्यांनी महाराज आणि त्यांच्या कुटुंबियांविषयी अर्वाच्य भाषेत वक्तव्य केली आहेत. त्यामुळे महाराजांचं मन दुखावलं असेल हे सर्व वेदनादायी असून कोल्हापूरची जनता हे अजिबात सहन करणार नाही.

भाजप एकतर्फी विजयी होईल?

ज्या महाराजांसाठी ६ महिन्यांपूर्वी गादीचा मान, गादीचा मान सांगत मतं मागत होते. आज त्याच महाराजांना ते बोलत होते. सतेज पाटील एवढे मोठे झाले का? की ते राजघराण्यावर बोलायला लागले, असा सवाल महाडिकांनी केला. शिवाय जे कोल्हापूर उत्तरमध्ये घडलं त्याचा परिणाम जिल्ह्यातील पाचही जागांवर दिसून येईल. या सर्व जागांवर काँग्रेसचा सुपडा साफ होऊन भाजप एकतर्फी विजयी होईल असा विश्वासही महाडिक यांनी व्यक्त केला.

ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉकचे कृष्णा पांडूरंग वाघमारे निवडणूक रिंगणात

शोषित, वंचित, आदिवासीच्या न्याय हक्कासाठी लढणारे नेतृत्व

उरण । विठ्ठल ममताबादे

उरण विधानसभा मतदार संघात १४ उमेदवार उभे असून गोर गरिब शोषित, वंचित आदिवासीच्या न्याय हक्का साठी ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक चे उमेदवार कृष्णा पांडुरंग वाघमारे (निशाणी सिंह)हे निवडणूक लढवित आहेत. उरण विधानसभा मतदार संघात आदिवासी, दिन, शोषित,वंचित घटकावर मोठ्या प्रमाणात अन्याय झाला आहे तसेच अनेक विविध समस्या प्रलंबित आहेत. त्या सोडविण्यासाठीच उरण विधानसभा मतदार संघातून ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक या पक्षातर्फे निवडणूक लढवित असल्याचे उमेदवार कृष्णा पांडुरंग वाघमारे यांनी सांगितले. निशाणी सिंह असलेल्या बटन दाबून मला बहुमताने निवडून द्या. जेणेकरून जनतेच्या समस्या मार्गी लावण्याचा प्रयत्न करेन असे आवाहन कृष्णा पांडुरंग वाघमारे यांनी जनतेला केला आहे.

आपले मत व्यक्त करताना कृष्णा पांडुरंग वाघमारे यांनी सांगितले की आदिवासी गावठाण, दली प्लॉट, वन हक्क, मूलभूत सुविधा (पाणी, घरकुल, रस्ते, शिक्षण आणि आरोग्य) हे प्रलंबित प्रश्न मार्गी लावणार,आदिवासी आणि ओबीसी च्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही,रिक्षावर ज्याचं पोट आहे अश्या सर्व रिक्षा धारकांना मोफत बिमा काढून देणार,उरणमधील वाढते दूषित वातावरण रोखण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून कोर्टात दाद मागणार,प्रत्येक नागरिकाला आपले अधिकार कळावे या साठी हर घर संविधान हा संकल्प राबवणार,चिरनेर हुतात्मा स्मारकाला पर्यटन स्थळ बनवणार,तरुणांना खेळाच्या माध्यमातून करियर संधी उपलब्ध करून देणार,१२. ५% आणि २२. ५% मध्ये शेतकऱ्यांवर होणारा अन्याय या साठी सिडको व इतर अन्याय संस्थेशी संघर्ष करणार,स्थानिकांना स्थानिक उद्योगात रोजगार संधी उपलब्ध करून देणार,जमिनी साठी बिटिशांविरुद्ध लढणाऱ्या सर्व हुतात्म्यांचे मेमोरियल बनवणार,वाढत्या गुन्हेगार प्रवृत्तीला रोखण्यासाठी पोलीस व न्यायालयाच्या माध्यमातून नागरिकांची सुरक्षा करणार,गरीब आणि गरजू विद्यार्थी जे सरकारी शाळेत शिकतात त्यांच्यासाठी शासन स्तरावर विविध योजनांसाठी मागणी करणार असल्याचे यावेळी कृष्णा पांडुरंग वाघमारे यांनी सांगितले.

याप्रसंगी उपस्थित असलेले इंडियन्स सोशल मूहमेंट चे महाराष्ट्र अध्यक्ष तथा संविधान प्रचारक अँडवोकेट प्रकाश विजय कदम (करंजाडे, पनवेल) यांनी ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक चे कृष्णा पांडुरंग वाघमारे यांना जाहिर पाठिंबा देत कृष्णा पांडुरंग वाघमारे हे जनतेच्या हितासाठी काम करतात अनेक समाजोपयोगी कामे त्यांनी केली आहेत. शोषित वंचित आदिवासी घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असतात. कृष्णा वाघमारे हे आदिवासी समाजातून आलेले उत्तम व आदर्श नेतृत्व आहे. त्यांना विधानसभेत पाठवून आदिवासी, बहुजन समाजाचा आवाज बुलंद करावा असे आवाहन ॲड. प्रकाश विजय कदम यांनी जनतेला केले आहे.

वैजापूरचे प्रसिद्ध उद्योजक बाळासाहेब संचेतींच्या घरावर आयकर विभागाचे छापे

छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे

वैजापूर राज्यभरात सध्या विधानसभा निवडणुकीची तयारी सुरु आहे. सर्वच राजकीय पक्षांकडून राजकीय प्रचार सुरु करण्यात आला आहे. याचदरम्यान छत्रपती संभाजीनगरमधील एक महत्वाची घडामोड समोर आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूरात आयकर विभागाची छापेमारी सुरु आहे. वैजापूर तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक बाळासाहेब संचेती यांच्या घरी, बँकेवर आणि कार्यालयावर आयकर विभागाने

छापा टाकला असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. बाळासाहेब संचेती वैजापूर को-ऑपरेटिव्ह मर्चेंट बँकेचे संचालक आहेत. तसेच शहरात विक्रम सुराणा यांच्या घरी देखील

छापेमारी सुरु असून विक्रम सुराणा हे बाळासाहेब संचेती यांच्या बहिणीचा मुलगा आहे. शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार दिनेश परदेशी यांचे निकटवर्तीय म्हणून बाळासाहेब संचेती यांची ओळख आहे. त्यामुळे या छापेमारीला राजकीय किनार असल्याची देखील सध्या चर्चा रंगली आहे.

पुण्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई–

पुणे जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने ऑक्टोबरपासून कारवाईत ९६ वाहनांसह ३ कोटी ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एका महिन्यात ९२३ गुन्हे नोंदवण्यात आले असून, ८४३ जणांना अटक करण्यात आली आहे. एक ऑक्टोंबर पासून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध पथके तयार करण्यात आली आहेत. जिल्ह्यात एकूण १८ तात्पुरते चेकनाके उभे करण्यात आलं असुन निवडणुकीच्या संदर्भात कसून तपासणी केली जात आहे.

पुरे आता धनशक्तीला एकदाचे गाडा–पुरुषोत्तम वीर

बीड वंचित बहुजन आघाडीच्या प्रचाराचा झंजावात उद्यापासून मतदार संघात

बीड । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडी बीड विधानसभा मतदार संघाला घराणेशाहीची कीड लागली पासून ही निष्क्रिय घराणेशाही कायमची उघडून फेका असे कळकळीचे आवाहन वंचित बहुजन तरुण तडफदार उमेदवार तरुण तडफदार उमेदवार पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर पत्रकातून जनतेला केले आहे. डोळयात भरेल असे क्षीरसागर कुटुंबाचे असे एकही विकास काम केले नाही. शिवावरूनच चाललेली रेल्वे ही यांना शिरूर कासार मार्गे वळवता आली नाही. शेकडो एकर जमीन हडपून बसलेल्या क्षीरसागर कुटुंबाने ऊस उत्पादक शेतकरी पुरता नागवला गेला आहे. तीन पिढ्यापासून हे कुटुंब मतदार संघातील सत्तेची फळे चाखत आहे. आणि आत्ता तर एकाच कुटुंबातील दोघा जणांना आमदारकीचे डोहाळे लागल्यामुळे त्यांच्या सत्ता पीपासूपणाचा कहर समोर आला आहे. दलित, मुस्लिम, ओबीसी, शेतकरी, शेतमजूर वंचित अशा सर्व घटकाचा पुरता भ्रमनिरास करणाऱ्या या धनशक्ती कुटुंबस रोखण्यासाठी वंचित बहुजन आघाडीने कंबर कसली असून यावेळी या प्रस्थापित धनशक्ती रोखूच असा निर्धार वंचित बहुजन आघाडीचे उच्चशिक्षित उमेदवार पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर यांनी पत्रकातून व्यक्त केला आहे.

वंचित
VANCHIT BAHUJAN AAG
VANC BAHU AAGH

नायगाव विधानसभा मतदार संघाची निवडणूक म्हणजे धनशक्तीच्या विरोधात जनशक्ती

निवडणुकीच्या रिंगणात डॉ.माधवराव विभुते

नायगांव । हानुमंत चंदनकर

उमेदवारी दाखल करून नायगाव विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीची रण धुमाळीत उडी घेतली आहे

नायगाव विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून उमेदवारी दाखल केलेले डॉ. माधवराव विभुते यांनी धनशक्तीच्या विरोधात जनशक्तीच्या बळावर सदरची निवडणूक लढवीत असल्याचे डॉ. विभुते यांनी सांगितले आहे

नायगाव विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत डॉ माधवराव विभुते यांनी सदरचा रंग संग्राम धन दांडग्याच्या विरोधात खेळण्यासाठी धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी शक्ती वंचित बहुजन आघाडीच्या पाठीमागे उभी असल्यामुळे सदरच्या निवडणुकीचा रणसंग्राम जिकंण्यासाठी लंगोट डॉ विभुते यांनी घातली आहे.

गंगापूरात निवडणूक निरीक्षकांनी केली स्ट्रॉग रूमची पाहणी

निवडणूक अधिकाऱ्यांना दिल्या सूचना

निवडणूक निरीक्षकांची गंगापूर विधानसभा मतदारसंघाला भेट

गंगापूर । प्रा संजय तुपे

बिहारचे निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निवडणूक निरीक्षक उज्वल कुमारसिंग यांनी येथील स्ट्रॉग रूमची पाहणी केली. तसेच गंगापूर विधानसभा मतदासंघाला एकत्रित भेट देऊन संबधित बार्बीचा आढावा घेतला.

या बैठकीत गंगापूर विधानसभा क्षेत्रातील निवडणूक प्रक्रिया व्यवस्थित आणि नियमानुसार पार पाडण्यासाठीच्या उपाययोजनांवर चर्चा झाली. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुचिता शिंदे, तहसीलदार नवनाथ वगवाड यांनी आपल्या विभागाच्या तयारीचा अहवाल सादर केला.

गंगापूरात येथील स्ट्रॉग रूमची पाहणी करताना निरीक्षक उज्वल कुमारसिंग.

यावेळी त्यांनी निवडणूक संबधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी डॉ सुचिता शिंदे, तहसीलदार नवनाथ वगवाड आदींची उपस्थिती होती.

यावेळी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र या ठिकाणी तिन्ही मतदान केंद्रावर पाहणी केली. तसेच विद्यालयातील शाशहरातील श्रीमती राजाबाई धूत कन्या शाळा या ठिकाणी ६ मतदान केंद्र असल्यामुळे त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. तसेच मतदार केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्था, मतदान यंत्रणांची सुरक्षितता, मॉक पोल प्रक्रिया, मतदारांना सोयीसुविधा, निवडणूक प्रचारावर लक्ष ठेवणे आणि निवडणूक खर्चाची तपासणी आदी मुद्यांवर विशेष चर्चा करण्यात आली.

प्रकारची अनुचित घटना घडू नये, यासाठी आवश्यक उपाययोजनांचा आढावा घेऊन त्याबाबत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

तत्पूर्वी, निवडणूक निरीक्षकांनी गंगापूर औद्योगिक प्रशिक्षण केंद्र कार्यालयातील स्ट्राँग रुम, धूत कन्या शाळा या ठिकाणी ६ मतदान केंद्र असल्यामुळे परिसराची पाहणी केली. यावेळी गंगापूर निवडणूक निर्णय अधिकारी डॉ सुचिता शिंदे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा गंगापूर तहसीलदार नवनाथ वगवाड, पोलीस निरीक्षक कुमारसिंग राठोड यांच्या सहा अधिकारी उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीसाठी २ लाखांहून अधिक शाईच्या बाटल्या

जालना । असलम कुरेशी

विधानसभा निवडणुकीकरिता मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर शाई लावण्यासाठी राज्यात सुमारे २ लाख २० हजार ५२० शाईच्या बाटल्यांची तरतूद करण्यात आली आहे. या शाईचे वाटप जिल्हानिहाय करण्यात येत आहे.

राज्यातील २८८ विधानसभा मतदार संघांमध्ये १ लाख ४२७ मतदान केंद्र आहेत. प्रत्येक मतदार केंद्रासाठी प्रत्येकी २ शाईच्या बाटल्या याप्रमाणे २ लाख ८५४ शाईच्या बाटल्यांची संख्या होते. २ लाख ८५४ शाईच्या बाटल्यांबरोबरच अधिकच्या म्हणून काही अशा एकूण २ लाख २० हजार ५२० शाईच्या बाटल्या, मतदानासाठी आवश्यक ते साहित्य येत्या काही दिवसात मतदान केंद्रानिहाय पोहोचविण्याची निवडणूक यंत्रणेमार्फत कार्यवाही सुरु आहे.



यावर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांकरिता राज्यातील २८८ मतदारसंघांमध्ये ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या मतदारांच्या डाव्या तर्जनीवर शाई लावण्याकरिता निवडणूक आयोगामार्फत सुमारे २ लाख २० हजार ५२० शाईच्या बाटल्याची मागणी नोंदविण्यात आली आहे. मतदारांच्या तर्जनीवर लावण्यात येणारी आणि काही दिवस न पुसली जाणारी ही शाई विशेषरित्या बनवली जाते. या सर्व शाईच्या बाटल्या जिल्हाधिकाऱ्यांना पुढील वाटपासाठी ताब्यात देण्यात येत आहेत.

मतदानाचा हक्क बजावल्याची खूण म्हणून सर्वसामान्य असो की लोकप्रतिनिधी अथवा सेलिब्रिटींकडून शाई लावलेल्या डाव्या हाताची तर्जनी अभिमानाने दाखविली जाते. लोकशाही मजबूत करणारी ही काळी रेष निवडणुकांचा अविभाज्य घटक बनली आहे.मतदान केंद्रावर मतदाराची ओळख पटविल्यानंतर त्याला प्रवेश दिला जातो. प्रत्यक्ष मतदानापूर्वीच मतदाराच्या डाव्या तर्जनीवर न पुसली जाणारी शाई लावली जाते. त्यानंतर मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठा घेतला जातो. मतदानापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष (पोलींग ऑफीसर) मतदाराच्या डाव्या तर्जनीवर शाई लावलेली आहे की नाही याची तपासणी करतात.

समीर वानखेडे, क्रांती रेडकर यांनी घेतले घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगचे दर्शन



छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे

खुलताबाद जगप्रसिद्ध तथा ऐतिहासिक वेरुळ येथे अंमली पदार्थ नियंत्रण कक्ष मुंबई चे माजी संचालक समीर वानखेडे व त्यांची पत्नी क्रांती रेडकर यांनी लेण्यांना भेट देत घृष्णेश्वर मंदिरात बाराव्या ज्योतिर्लिंगचे दर्शन घेतले.

सद्या दिवाळी सुट्टी सुरू असुण या दरम्यान समीर वानखेडे व त्यांची पत्नी क्रांती रेडकर ऐतिहासिक तथा जगप्रसिद्ध वेरूळ येथे दि.४ आले होते. त्यांनी वेरुळ लेणी येथे पर्यटक म्हणून भेट दिली तर घृष्णेश्वर मंदिर येथे बाराव्या ज्योतिर्लिंगचे दर्शन घेतले.

केज मतदार संघातील विचारांचे मतदार नक्कीच मला संधी देतील–रमेश गालफाडे

केज । सचिन भालेराव

महाराष्ट्रामध्ये सत्ता परिवर्तन घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक राज ठाकरे यांनी कंबर कसली आहे. महाराष्ट्रामध्ये यावर्षी अनेक मतदारसंघांमध्ये संपूर्ण तयारीनिशी राज ठाकरे यांनी उमेदवार दिले आहेत. आणि याच परिवर्तनाचा एक भाग म्हणून केज विधानसभा मतदारसंघातून ही रमेश गालफाडे यांना उमेदवारी देऊन मोठी ताकद लावण्याचे काम मनसे कडून होत आहे.

राज ठाकरे यांची महाराष्ट्रात एक आगळीवेगळी ओळख आहे. विकासाची दृष्टी असलेले आणि परखड मते मांडणारे म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्थापनेनंतर राज्यात मनसेचे १३ आमदार निवडून आले होते आणि त्या आमदारांनी मोठ्या प्रमाणावर विकासाची कामेही केलेली आहेत. मात्र मध्यंतरीच्या काळात राज ठाकरे यांच्या पक्षाला म्हणावे तेवढे यश मिळाले नव्हते. मात्र त्यांच्या विचारांचे लोक वर्षानुवर्षे वाढत चाललेले आहेत. मागच्या कित्येक वर्षांपासून महाराष्ट्रावर जे राज्य करतात ते केवळ आश्वासने आणि भुलथापा देतात, विकासाच्या नावाने बट्ट्याबोळ झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये मराठी माणूस असुरक्षित झालेला आहे, तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत आणि म्हणूनच या सर्व गोष्टींवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी राज ठाकरे या विधानसभेमध्ये मोठ्या ताकतीने मैदानात उतरले आहेत. महाराष्ट्रातील अनेक मतदारसंघांमध्ये चाचणी केल्यानंतर अनुकूल असणाऱ्या मतदारसंघांमध्ये मनसेने उमेदवार दिलेले आहेत. आणि याच चाचणीमध्ये केज विधानसभा मतदार संघही मनसे साठी अनुकूल वाटल्याने केज ची जागा लढवण्याचा निर्धार त्यांनी केला. केज विधानसभा मतदारसंघांमध्ये राज ठाकरे यांच्या विचारांचे कित्येक मतदार आहेत. मात्र अद्याप पर्यंत राज ठाकरे यांच्या विचाराला आणि त्यांच्या पक्षाला मतदान करण्याची संधी नव्हती. त्यामुळे यावेळी सामाजिक कार्यकर्ते रमेश गालफाडे यांना मनसे कडून उमेदवारी दिलेली असल्याने मनसेच्या रेल्वे इंजिन ला मतदान करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. आणि मनसेचे रेल्वे इंजिन विधानसभा मतदारसंघांमध्ये वेगाने धावू लागले आहे.

दरम्यान रमेश गालफाडे यांचीही मतदार संघामध्ये एक विशिष्ट ओळख निर्माण झालेली आहे. मोठ्या प्रमाणावर सामाजिक कार्याच्या माध्यमातून रमेश गालफाडे यांनी मतदारांमध्ये जवळीकता निर्माण केलेली आहे. दूरदृष्टी असलेले आणि सर्वांशी परिचित असलेले रमेश गालफाडे हे सध्या मतदारांच्या पसंतीस उतरत आहेत. एवढेच नव्हे तर राज ठाकरे यांचे विचार नक्कीच मला प्रतिनिधित्व करण्याची संधी देतील असा विश्वास व्यक्त करत तात्या प्रचाराला लागलेले आहेत.

आपले कष्ट आणि निष्ठा निरर्थक जाणार नाही

शरदचंद्र पवार यांनी राजेभाऊ फड यांना लिहिले पत्र

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांनी युवक नेते राजेभाऊ फड यांना पत्र पाठवून आपल्या भावना कळवल्या आहेत. परळी विधानसभा मतदारसंघात आपण घेतलेली मेहनत आणि कष्टाला निरर्थक जाऊ देणार नाही. तुम्ही केलेल्या कामाची पक्षाने नोंद घेतली असून आपल्याला भविष्यात योग्य न्याय दिला जाईल असा शब्द त्यांनी युवक नेते राजेभाऊ फड यांना दिला आहे

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांनी युवक नेते राजेभाऊ फड यांना नुकतेच पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी राजेभाऊ फड यांचे कौतुक केले असून, पक्षाचे मतविभाजन होऊ नये यासाठी त्यांनी घेतलेली माघार अभिनंदनीय असल्याचे म्हटले आहे.



शरद पवार
संसद सदस्य
(राज्य सभा)

आपला कृतज्ञ,

(शरद पवार)

इच्छुक उमेदवार संख्या जास्त असल्याने त्यातून उमेदवार देत असताना मानाची घालमेल होत असून, आपण पक्षासाठी केलेलं काम आणि पक्षाप्रती असलेली निष्ठा निरर्थक जाऊ देणार नसल्याचा शब्द त्यांनी दिला आहे. यात त्यांनी पुढे म्हटले आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा आपल्यासारख्या कार्यकर्त्यांच्या बळावर मोठा झालेला पक्ष आहे. जनकल्यानाचे ध्येय पूर्ण करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कामाला लागायचे असून आपल्या कामाची आणि आपल्या पक्षाप्रती असलेल्या निष्ठेची आम्ही नोंद घेतली असल्याचेही शरदचंद्र पवार यांनी लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

केज मतदारसंघात विकासाच्या मुद्यावर आ.नमिता मुंदडा विजयी होणार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केज मतदारसंघातील निवडणूक आता खऱ्या अर्थाने रंगात आली आहे. निवडणूक होत असली तरी केलेल्या विकासकामांच्या जोरावर त्यांनी केज मतदारसंघातील जनता भाजप महायुतीच्या उमेदवार नमितताई मुंदडा यांनाच निवडून देणार असल्याचे दिसून येत आहे.

आ.नमिता मुंदडा या त्यांनी केलेल्या विकासकामांमुळे केज विधानसभा मतदारसंघातून प्रचंड मतांनी निवडून येतील असा विश्वास सर्वसामान्य जनतेला वाटू लागला आहे. मुंदडा कुटुंबाचे समर्थक सध्या आमदार ताई सोबत प्रचारात सक्रिय आहेत. त्यांना भरभरून प्रतिसाद मिळत आहे. भाजप महायुतीच्या उमेदवार आ.नमिता अक्षय मुंदडा यांच्याकडे केज मतदारसंघात विश्वासू कार्यकर्त्यांची मजबूत फळी व संघटन आहे. मागील पाच वर्षांत केज मतदारसंघात केलेल्या सातत्यपूर्ण भरीव विकास कामांमुळे आ.नमिता मुंदडा यांनी प्रचारात इतर उमेदवारांपेक्षा मोठ्या प्रमाणात आघाडी घेतली आहे. भाजपचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांची खंबीर साथ आ.नमिता मुंदडा यांच्यासोबत असल्याने आ.मुंदडा यांचा विजय सुकर झाला आहे. असे वातावरण सर्वत्र निर्माण झाले आहे.अंबाजोगाई शहरातून प्रमुख पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते आ.नमिता मुंदडा यांना विजयी करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेऊन प्रयत्न करीत आहेत. आ.नमितताई मुंदडा यांनी दि.६ नोव्हेंबर रोजी केज मतदारसंघातील प्रचार दौऱ्याच्या निमित्ताने वेगवेगळ्या गावांना भेट दिली व सर्वांशी थेट संवाद साधला. या प्रसंगी भारतीय जनता पक्ष आणि महायुतीचे सन्माननीय नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

निवडनुक क्षनीक आनंद मि समाजाच वाटोळ होऊ देनार नाही–मनोज जरांगे

टाकरवण । प्रतिनिधी

माझ्या समाजाचे योगदान वाया जाऊ देणार नाही. मी योग्यच करणार आहे. मराठा समाजाने मुलगा म्हणून माझ्यावर विश्वास ठेवाला. समाजाचं वाटोळं होऊ देणार नाही असे मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे समाज बांधवांशी बोलताना म्हणाले. गाव भेट व संवाद दौऱ्यानीमीत्ता मनोज जरांगे हे बुधवार ता ०६ रोजी टाकरवण येथे आले होते. या दौऱ्याला प्रचंड प्रतिसाद मिळत असून मराठा समाज हजारोंच्या संख्येने सहभागी होत आहे.पुढे बोलतांना ते म्हणाले की, पुन्हा एकदा आरक्षणाचा लढा सुरू झाला आहे. पुन्हा लढा उभा करायचा आणि आरक्षण मिळवायचे. राजकारणासाठी असतो तर उमेदवार उभे केले असते. माझा समाज माझ्यासाठी मोठा आहे. समाजाचे भविष्य बघायचे आहे. मूर्ख होऊन चालणार नाही. दीडशे जणांना उभे केले असते. त्यांच्यासाठी सहा कोटी समाजाचे वाटोळे करू शकत नाही. तो क्षणिक आनंद आहे. समाजाला आरक्षण देऊन आयुष्यभराचा आनंद द्यायचा आहे. मागे सरकलो म्हणून काय वाईट झाले. मराठा समाजाचे काम करतो दीडशे जणांचे काम करत नाही. त्यांच्यासाठी करोडो मराठ्यांना अडचणीत आणणार नाही, असे मनोज जरांगे पाटील यांनी ठामपणे सांगितले.

जरांगे पाटील
टाकरवण नगरीत हार्दिक स्वागत

यावेळे समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

राज ठाकरेच्या टिकेला पलटवार

पाडापाडी करायची तर करा समाजाला कसे आरक्षण मिळवून देणार अशी टीका मनसेचे राज ठाकरे यांनी केली होती.या टिकेला प्रति उत्तर देताना मनोज जरांगे म्हणाले आम्हाला राजकारणाचं काही देणं घेणं नाही माझ्या नादाला लागू नका नादी लागला तर कार्यक्रम केल्याशिवाय राहणार नाही मी अजून माझ्या समाजाला काहीच सांगितलं नाही समाजाला आदेश दिला तर तुम्हाला गोळ्या सुरू करायची वेळ येईल येणाऱ्या काळात ठरवू काय करायचे तर मात्र आमच्या आरक्षण मागणीचा लढा सुरूच राहील मी समाजाला आरक्षण मिळूनच देणार,मी राज ठाकरेला टाकरवन येथून आव्हान करतो माझ्या नादी लागू नका.

मनोज जरांगे यांच्या हस्ते कुणबी प्रमाणपत्र वाटप मनोज जरांगे पाटील यांच्या लढ्यामुळे मराठा समाजाला मोठ्या प्रमानावर कुनबी प्रमानपत्र मिळाली.टाकरवन येथेही निनामकालीन नोदी सापडल्याने समाला कुनबी प्रमानपत्र मिळाले आहेत.या प्रमान पत्राचे जरांगे यांच्या हस्ते वाटप करन्यात आले आहे.उर्वरीत समाजाच्या नोदी सापडन्यासाठी मागनी सुरुच आहे.नोदी काढुन घ्या असे पाटील म्हनाले.

हबिसेवाडी येथील असंख्य कार्यकर्त्यांचा मुख्यमंत्री शिंदे यांच्या शिवसेनेत पक्षप्रवेश

आ.शहाजीबापू पाटील यांच्या नेतृत्वाखाली रासप , राष्ट्रवादी काँग्रेस, शेकाप कार्यकर्त्यांचा शिवसेनेत पक्षप्रवेश

सांगोला । प्रतिनिधी

सांगोला तालुक्यातील हबिसेवाडी येथील रासप ,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ,शेतकरी कामगार पक्ष या पक्षातील असंख्य कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत सांगोला विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार आमदार शहाजीबापू पाटील यांच्या नेतृत्वाखाली पक्षप्रवेश केला आहे. शिवसेनेत पक्षप्रवेश करण्यासाठी युवा कार्यकर्ते शंकर दुधाळ, रमेश खरात ,खंडू खरात यांचे मार्गदर्शन लाभले.

पक्षप्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये दिलीप उत्तरे, दत्ता उत्तरे, विलास उत्तरे ,रघुनाथ उत्तरे ,तानाजी उत्तरे ,यशवंत उत्तरे, पांडुरंग उत्तरे, ज्ञानेश्वर उत्तरे ,सुभाष उत्तरे, संतोष उत्तरे, महादेव उत्तरे, राहुल उत्तरे, तातोबा उत्तरे, संजय उत्तरे यांच्यासह आदी कार्यकर्त्यांचा समावेश आहे .

यावेळी पक्षप्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आमदार शहाजीबापू पाटील यांनी सांगितले की, निवडणूक अटी तटीची असून निवडणुकीत धनुष्यबाण हे आपले चिन्ह आहे. कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त मतदान कसे करता येईल यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत. कार्यकर्त्यांच्या अडचणी प्रसंगी आपण सर्वतोपरी सहकार्य करू असे आश्वासन बापूंनी दिले. आहे. तर कार्यकर्त्यांनी बापूंचे आशीर्वाद घेऊन आजपासून प्रचार यंत्रणेमध्ये आपण झोकुन देऊन काम करू असे सांगितले. तसेच अधिकाधिक मतदान कसे करता येईल या दृष्टीने आपण प्रामाणिकपणे अहोरात्र काम करू व आमदार शहाजीबापू पाटील यांना निवडून आणु विश्वास व्यक्त केला.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिनानिमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

बीड । प्रतिनिधी

भारतीय संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सातारा येथील गव्हर्नमेंट इंग्लिश मीडियम हायस्कूल सध्याचे प्रतापसिंह हायस्कूल या शाळेमध्ये ०७ नोव्हेंबर १९०० साली इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतला होता. या शाळाप्रवेश दिनाला १२५ वर्षे पूर्ण होत आहे. या शाळा प्रवेश दिनाचे औचित्य साधून नालंदा फाउंडेशन बीड यांनी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर व विद्यापीठ स्तरीय शिक्षकांसाठी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले असून या स्पर्धेत शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन स्पर्धेचे मुख्य संयोजक तथा नालंदा फाऊंडेशन बीडचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे यांनी केले आहे.

सदरील राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा रविवार दिनांक २२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता तुलसी संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय सभागृह आदर्श नगर डी.पी. रोड, बीड या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा विद्यार्थीप्रिय, समाजप्रिय, शिक्षणप्रिय, देशप्रिय असणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असणारी व्यवस्था व त्या व्यवस्थेचा पुनर्विचार व्हावा यासाठी आयोजित करण्यात आली असून यास्पर्धे मागचा हा मुख्य उद्देश असल्याचे स्पर्धेचे मुख्य संयोजक प्रा.प्रदिप रोडे यांनी सांगितले आहे.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक परिश्रमातून अनेक संकटे झेलून संविधानाच्या रूपातून या देशाची परिवर्तनवादी समाज व्यवस्था निर्माण करण्याचे काम केले आहे. द सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून बाबासाहेबांना आज जगभर ओळखले जात आहे. महापुरुषाचे स्मरण व्हावे, त्यांच्या विचारांना चालना देण्यासाठी शिक्षकांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संयोजकांच्या वतीने सांगण्यात आली आहे.

सर्व शैक्षणिक गटातील शिक्षकांसाठी ही स्पर्धा खुली असून स्पर्धेच्या बक्षिसाचे स्वरूप प्रथम पारितोषिक २५००० रुपये धनादेश, स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र असे आहे. दुसरे पारितोषिक १५००० रुपये धनादेश स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक १०००० रुपये धनादेश, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असे आहे.

यास्पर्धेचे विषय १) अभ्यासपूरक उपक्रम आणि विद्यार्थी विकास.

२) शिक्षणातून सुसंस्कृत समाज.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विद्यार्थी म्हणून समजून घेताना.

असे आहेत. वरील तीन विषयांपैकी एका विषयावर शिक्षक स्पर्धकाला आपले वक्तृत्व सादर करण्याची तयारी असावी. स्पर्धेत सहभागी होणारा शिक्षक हा कार्यरत असणे आवश्यक असून कार्यरत असल्याबाबतचे ओळखपत्र अथवा कार्यालयाचे प्रवेश पत्र सादर करणे आवश्यक आहे. स्पर्धकाने आपली प्रवेश नोंदणी दि. ११ डिसेंबर २०२४ रोजी पर्यंत करणे अनिवार्य आहे. त्यानंतर प्रवेश नोंदविला जाणार नाही असे संयोजकाच्या वतीने सांगण्यात आले असून स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवेश शुल्क ५०० रुपये प्रवेश शुल्क असणार आहे. स्पर्धकांसाठी स्पर्धेतील नियम व अटी बंधनकारक राहतील. तरी उत्स्फूर्त स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवताना हींीि://वेली.सेसश्रश.लो/षेीी/व/श/१ऋ-खटिङडशगटूक ीि=ीषुश्रळपज्ञ या ऑनलाईन लिंकचा वापर करून प्रवेश फॉर्म भरणे आवश्यक आहे तसेच प्रवेश शुल्क रक्कम फोन पे / गुगल पे मोबाईल क्रमांक ९८६०९०८९२२ या नंबर वरती ी पाठवावी, असे आवाहन नालंदा फाउंडेशन बीडचे अध्यक्ष व स्पर्धेचे मुख्य संयोजक प्रा. प्रदीप रोडे केले आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तसेच अधिक माहितीसाठी मोबाईल क्रमांक ९४२३२०३१९९, ९८३४६२९२०० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर व विद्यापीठ स्तरीय शिक्षकांनी स्पर्धेत सहभागी व्हावे – मुख्य संयोजक प्रा.प्रदिप रोडे यांचे आवाहन

एका जातीवर राजकारण होत नाही हे खरेच

बच्चू कडु यांनी केली मनोज जरांगेंच्या निर्णयाची पाठराखण

नागपूर (वृत्तसंस्था)–एका जातीवर राजकारण होत नाही, असे मनोज जरांगे माघार घेताना बोलले. ते बोलते ती वस्तुस्थिती आहे. सर्व राजकीय पक्ष धर्म आणि जातीवर निवडणूक लढवत आहे. त्यासोबत पैशाची ताकद असते. हे समीकरण मोठ्या पक्षांनी सुरू केले आहे. त्यामुळे जरांगे जे बोलले ते योग्यच आहे अशा शब्दात प्रहार जनशक्ती पार्टीचे अध्यक्ष बच्चू कडु यांनी जरांगे यांच्या माघारीची पाठराखण केली.एका जातीचे राजकारण होते, हे मी जरांगे यांना समजावून सांगितले नाही. कारण मी काही कोणाचा राजकीय गुरू नाही. त्यामुळे समजून सांगायची गरज नाही आणि जरांगे तसेही हुशार आहे. मातीवरच्या, जमिनीवरच्या माणसाला समजावून सांगायची गरज पडत नाही. मोठ्या नेत्यांना समजावून सांगणारे पंधरा-वीस लोक असतात. मात्र बच्चू कडू आणि इतर जमिनीवरच्या कार्यकर्त्यांना समजावण्याची गरज पडत नाही, असा टोला कडु यांनी लगावला. मुळात केलेले काम समोर ठेवून निवडणूक लढवली पाहिजे. मात्र सर्व राजकीय पक्षांनी राजकारणाची व्याख्या बदलून टाकली आहे. बच्चू कडू चार वेळेला निवडून आले. कारण पक्षांची झुंडशाही मी माझ्या मतदारसंघातून संपवली, तेच महाराष्ट्रात करू असे ते म्हणाले.

मनोज जरांगेवर राजकीय दबाव होता, असे मला वाटत नाही. जरांगे दबावाला बळी पडणारा माणूस नाही. मनोज जरांगेच्या माघारीमुळे कोणाचा फायदा होईल, याचे कुठलेही मोजमाप यंत्र नाही. ग्राउंडवरची राजकीय परिस्थिती वेगळी असते. मनोज जरांगेनी परिवर्तन महाशक्तीला पाठिंबा दिला पाहिजे की नाही, या संदर्भात संभाजी राजे निर्णय घेतील. कोणीही पाठिंबा दिला तरी फायदा होतोच. कोणीही चेंडू टाकला तर आम्ही बॅटिंग मजबूत करतो. बच्चू कडूची बॅटिंग टाइमिंग आणि वार कसा असतो, हे तुम्हाला निवडणुकीत तुम्हाला माहित पडेल.

मलवडी येथे नारायण पाटील गटाला धक्का

पै.बंडुनाना कोंडलकर व उपसरपंच साहेबराव दुरगुळे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते संजय शिंदे गटात

सोलापूर । प्रतिनिधी

मलवडी येथे माजी आमदार नारायण पाटील यांच्या गटाला मोठा धक्का बसला असून, पैलवान बंडुनाना कोंडलकर व उपसरपंच साहेबराव दुरगुळे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते आमदार संजय शिंदे यांच्या गटात सामील झाले आहेत. आमदार शिंदे यांनी २०१७ पासून करमाळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी अपार मेहनत घेतली असल्याचे सांगितले व प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांना भावासारखे पाठबळ देण्याचे आश्वासन दिले.

मलवडी येथे आयोजित सभेत विजय पालवे, गुरुनाथ पालवे, राघू कोंडलकर, रमेश कोंडलकर, आबा कोंडलकर, रेवणनाथ कोंडलकर, सर्जेराव कोंडलकर, रवींद्र पालवे, सर्जेराव बागल, पप्पू कोळी, कल्याण सातव तसेच पाथुर्डी येथील सदाशिव तोडेकर, हनुमान तोडकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला.

यावेळी माजी सभापती गोकुळ पाटील, ज्ञानेश्वर शेलार, माजी जिल्हा परिषद सदस्य उध्दव माळी, चंद्रहास निमगिरे, माजी पंचायत समिती सदस्य विलास पाटील, सरपंच तानाजी झोळ, पैलवान उमेश इंगळे, राजेंद्रकुमार बारकुंड, म्हैसगावचे लक्ष्मण पाटील, प्रविण पाटील, धनंजय मोरे, मारुती पारखे, सरपंच किरण फुंदे, सरपंच रवींद्र वळेकर, घोटीचे सरपंच विलास राऊत, गुलाबराव देवकते, भाऊसाहेब खरात, अभिजित तळेकर, पैलवान चेतन पाटील, सनी टकले, महावीर कोंडलकर, शहाजी कोंडलकर, सिध्दूभाऊ मोटे, मयुर रोकडे, अशोक तकिक यांसारखे विविध क्षेत्रातील मान्यवरही उपस्थित होते.प्रारंभी मलवडी गावातून आमदार संजय शिंदे यांची घोड्यावरून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. फटाक्यांच्या आतिषबाजीमध्ये सभास्थळी त्यांच्या स्वागतासाठी ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली

मुंबई । प्रतिनिधी

ऐन विधानसभा निवडणुकीच्या धामधडीत निवडणूक आयोगाने मोठा 'अ‍ॅक्शन' घेत रश्मी शुक्ला यांना पोलीस महासंचालक पदावरून हटवले आहे. त्यांच्याजागी वरिष्ठ 'आयपीएस' अधिकाऱ्यांकडे पदभार द्यावा, असे निर्देश निवडणूक आयोगाने राज्याच्या मुख्य सचिवांना दिले आहेत.

काँग्रेससह महाविकास आघाडीतील नेत्यांनी रश्मी शुक्लांना हटविण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली होती. त्यामुळे महाविकास आघाडीच्या मागणीला यश आलं आहे. विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून राज्यातील राजकीय हिंसाचारात वाढ झाली आहे, विरोधी पक्षाचे उमेदवार आणि नेतेमंडळींना धमकावले जात आहे. कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडली असल्याने काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना जाणीवपूर्वक त्रास दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी निवडणूक आयोगाला पत्र पाठवून रश्मी शुक्ला यांना तातडीनं पदावरून दूर करावे, अशी मागणी केली होती. निवडणूक आयोगाने याची गंभीर दखल घेतल्याचे दिसत आहे, कारण रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आली आहे. त्यांनी कुठे बदली केली आहे आणि कुठला पदभार देण्यात आला आहे, याची माहिती अद्याप मिळालेली नाही.

रश्मी शुक्ला १९८८ च्या बॅचच्या 'आयपीएस' अधिकारी आहेत. सशस्त्र सीमा बलचे केंद्र प्रमुख आणि पुणे पोलीस आयुक्त म्हणून त्यांनी कार्य केले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील अधिकारी म्हणून देखील रश्मी शुक्ला यांची ओळख आहे. महाविकास आघाडीतील नेत्यांचे फोन टॅपिंग केल्याच्या प्रकरणामुळे त्या चर्चेत आल्या होत्या.रश्मी शुक्ला यांचा कार्यकाळ संपला आहे. मात्र, दोन वर्षे त्यांना मुदतवाढ देण्यात आली आहे. कार्यकाळ संपल्यानंतर शुक्लांना घरी पाठवलं पाहिजे. निवडणुकीच्या कोणत्याही प्रक्रियेत शुक्लांना ठेवण्यात येऊ नये, अशी आमची विनंती राहणार आहे. पोलीस महासंचालक हे महत्त्वाचं पद आहे. रश्मी शुक्ला पदावर बसल्यापासून कायदा सुवस्था बिघडलेली होती. वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पोलीस महासंचालक पदाची जबाबदारी देऊन राज्यातील गुन्हेगारी संपवावी, अशी मागणी नाना पटोले यांनी केली आहे.

अपक्ष उमेदवारांचा आमदार संजय शिंदे यांना जाहीर पाठिंबा

सोलापूर । प्रतिनिधी

२४४ करमाळा विधानसभा मतदारसंघाच्या अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी, मराठा सेवा संघाचे माजी तालुका अध्यक्ष डॉ. सुजितकुमार काशिनाथ शिंदे यांनी संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांच्या आदेशानुसार आपला उमेदवारी अर्ज माघारी घेऊन आमदार संजय विठ्ठलराव शिंदे यांना आपला जाहीर पाठिंबा दिला. यासोबतच, सुहास शिवमुर्ती ओहोळ यांनीही आपला अर्ज माघारी घेऊन आमदार संजय शिंदे यांना पाठिंबा दिला.

यावेळी बोलताना डॉ. सुजितकुमार शिंदे आणि सुहास ओहोळ म्हणाले की, आमदार संजयमामा शिंदे हे विकासप्रिय आमदार आहेत. त्यांच्या कामामुळे आम्ही प्रभावित झालो आहोत. तसेच, मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार हा निर्णय घेतला आहे. आमचा पाठिंबा देण्यापलीकडे आमदार शिंदे यांचा जाहीर प्रचार करून त्यांना निवडून आणण्यासाठी २४ तास प्रयत्न करणार आहोत. यावेळी डॉ. सुजितकुमार शिंदे, सुहास ओहोळ यांच्यासह प्रवीण पाटील, सुजित बागल, तात्या पाटील, पै. अनिल पवार, गौतम ढाणे, सतीश पाटील, किसन पिंपरे, सोमा लांडे, बबन चोरमले, भाऊ साहेब शेळके, पैलवान अमोल गायकवाड, दिलीप बागल, नानासाहेब नलावडे, युवराज गपाट, मनोहर रंदवे, आबासाहेब ननवरे, अभिजीत ननावरे, अमोल चाळक, महेश काळे, विनय ननवरे, आजिनाथ मोरे, दिगंबर झिंजाडे आदी उपस्थित होते.आमदार संजय शिंदे यांना मिळालेल्या या पाठिंब्यामुळे करमाळा विधानसभा मतदारसंघात राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. आगामी निवडणुकीत या पाठिंब्याचा मोठा प्रभाव पडणार असल्याचा विश्वास संबंधित उमेदवारांनी व्यक्त केला आहे.

अखिल भारतीय खुली आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धा ६ नोव्हेंबरपासून अहिल्यानगर येथे सुरू

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फौंडेशन व अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय खुली आंतरराष्ट्रीय मानांकित बुद्धिबळ स्पर्धा बुधवारी, ६ नोव्हेंबरपासून अहिल्यानगरमधील सप्तक सदन येथे सुरू होणार आहे. ही स्पर्धा रविवारी, १० नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे, अशी माहिती अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.

देशभरातून विविध राज्यांतील खेळाडू या स्पर्धेत सहभाग घेणार असून गुजरात, आंध्र प्रदेश, दिव, दमन, गोवा, तमिळनाडू आदी राज्यांमधून २०० हून अधिक खेळाडूंनी आपली नोंदणी केली आहे. इंटरनॅशनल मास्टर विक्रमादित्य कुलकर्णी यांच्यासह अनेक दिग्गज खेळाडूही स्पर्धेत सहभागी होणार असल्याचे जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

या स्पर्धेत ५.५ वर्षांचा सर्वात लहान खेळाडू आणि ८३ वर्षांचे ज्येष्ठ खेळाडू यांचा समावेश असून, बुधवारी सकाळी ११.३० वाजता स्पर्धेचे उद्घाटन होईल. एकूण ९ फेऱ्यांत खेळवण्यात येणाऱ्या या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ रविवारी, दुपारी २ वाजता अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते होणार आहे.

स्पर्धेच्या पंच म्हणून शार्दुल तापसे (सांगली), अमरीश जोशी (संभाजीनगर), पवन राठी (पुणे) यांच्यासह चार सहाय्यक पंचांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी दिली.

कोण कोणाला पाडा असे म्हणू शकत नाही:तशी परिस्थिती पुन्हा राज्यात येणार नाही-पंकजा मुंडे

पुणे (वृत्तसंस्था)

आम्ही कार्यकर्ते एक विचारधारा आधारे निवडणूक लढत आहे. आघाडी सरकार जनतेचा विश्वासघात करून सत्तेत आले आणि जनतेकरीता त्यांनी काही केले नाही. लोकसभा निवडणुकीत मराठवाडामध्ये अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली नाही. पण जनता आता सुज्ञ आहे. कोणत्याही फेक नरेटिव्हला ते बळी पडणार नाही. विकासाचे बाजूने जनता मते देईल. कोण कोणाला पाडा असे आता म्हणू शकत नाही, अशी परिस्थिती पुन्हा राज्यात येणार नाही. 'बटेंगे तो कटेंगे 'हा मुद्दा मला पटत नाही, सोशल मीडियावर जे येते त्याच्याशी आम्ही सहमत नाही. मनोज जरांगे यांच्या निर्णयाबद्दल मी काही बोलणार नाही, लोकशाहीत सर्वांना निवडणूक लढण्याचा किंवा न लढविण्याचा अधिकार आहे. त्यांच्या फायदा आणि नुकसानवर आधारित आम्ही निवडणूक लढत नाही, लोकशाहीत विरोधक त्यांची भूमिका मांडतात आम्ही आमचे पक्ष काम करत आहे, असे मत भाजप आमदार पंकजा मुंडे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

यावेळी भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी खासदार डॉ.प्रीतम मुंडे, प्रवक्ते संदीप खर्डेकर, अमोल कवीटकर, हेमंत लेले, पुष्कर तुळजापूरकर , नामदेव माळवदे उपस्थित होते.पंकजा मुंडे म्हणाल्या, दिवाळी पार पडली असून भाऊबीज आता झाल्याने सर्वजण निवडणूक तयारीस लागले आहे. पुणे जिल्ह्यात २१ जागा असून १८ आमच्या महायुतीकडे आहे. आता आम्ही सर्व २१ जागा जिंकवणे प्रयत्न करत आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पदभार स्वीकारला आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना घेऊन आम्ही मतदार यांच्यापर्यंत पोहचत आहे. सरकारचे उत्कृष्ट निर्णय सोबत घेऊन आम्ही वाटचाल करत आहे. पण लोकसभा निवडणुकीत आम्हाला राज्यात अपेक्षित यश मिळाले नाही. जे फेक नरेटिव्ह तयार करण्यात आले त्यावर आता जनतेचे डोळे खाडकन उघडले आहे. हरियाणामध्ये भाजपला जनतेने साथ दिली असून तेच चित्र राज्यात दिसेल. सर्वाधिक मोठा पक्ष म्हणून आम्ही मागील निवडणुकीत विजय मिळवला पण अनपेक्षित आघाडी राज्यात झाल्याने आम्ही काही काळ सत्तेबाहेर राहिलो. मात्र, आता आम्ही पूर्ण तयारीने निवडणुकीत तयारी करत आहे. भाजप मध्ये पक्षाचा आदेश अंतिम असतो, कार्यकर्ते एखादा निर्णय होईपर्यंत वाट पाहतात, मागणी करतात पण त्यानंतर ते पक्ष आदेश पाळतात.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077